# नि.६९ वरील आदेश

## {अंकुश –वादी वि. बाळकृष्ण –प्रतिवादी }

प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता आदेश २६, नियम ९ नुसार दावा मिळकतीची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, सावंतवाडी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करावी याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादी क्र. २ च्या कथनानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापना व ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील दावा जमिनी वादीच्या ताब्यात असून दावा मिळकत स. नं. २५ हि. नं. १ या जमिनीत त्याच्या मालकीचा इमला नं. २९७ असल्याचे वादीने दाव्यात कथन केले आहे. सदर इमला नं. २९७ हा स. नं. २५ हि. नं. १ या जमिनीत आहे किंवा कसे ही वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे न्यायाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. सबब तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सावंतवाडी यांची प्रस्तुत दाव्याकामी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्याची विनंती केली आहे.

३) वादीने नि. ७७ वर आपले म्हणणे सादर करुन अर्जास विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत अर्ज चुकीचा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र.२ प्रस्तुत अर्जात करीत असलेली मागणी कायद्याने मिळण्याजोगी नाही. प्रतिवादी क्र.२ न्यायालयाची दिशाभुल करत आहे. प्रतिवादीने मागणी केल्याप्रमाणे कोर्ट कमिशनची नियुक्ती करणे आवश्यक नाही. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न

करीत आहे. तसेच दाव्यास विलंब होण्याच्या उद्देशाने सदर अर्ज दाखल करण्यात आला आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४) अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५) प्रतिवादी क्र. २ च्या कथनानुसार वादीने प्रस्तुत दाव्यात दावा मिळकत स.नं. २५ हि. नं. १ या जमिनीत त्याच्या मालकीचा इमला नं. २९७ असल्याचे कथन केले आहे. त्याबाबत वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणण्याकरीता व सदर इमल्याच्या खाणाखुणा व नकाशा अभिलेखावर येणे जरुरी आहे याकरीता प्रतिवादी क्र. २ याने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सावंतवाडी यांची कोर्ट कमिशन म्हणून नेमणुक करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.२ याने अर्जात केलेली मागणी ही पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने केली असल्याचे दिसून येते. वादीने दाव्यात केलेली कथने शाबीत करण्याची जबाबदारी त्याची आहे. प्रतिवादी क्र.२ याने दिलेला प्रस्तुत अर्ज बेकायदेशीर आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2024.11.29 17:12:58 +0530

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी

ठिकाण : सावंतवाडी
दिनांक २९/११/२०२४